(46)

महाराष्ट्र शासन

क्र.- आयटीआय- २००८/(५८०/०८)/व्यशि-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १३ ऑगस्ट, २००८.

प्रति,
संचालक (प्रशिक्षण),
व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य,
मुंबई - ४०० ००१.

विषय :- सत्र २००८-०९ करीता कै.ग.सु.वराडे, औ.प्र.केंद्र,मुक्ताईनगर, जि.जळगांव या संस्थेस नवीन व्यवसाय/ज्यादा तुकडीस परवानगी मिळण्याबाबत.

संदर्भ :- आपले पत्र क्र.१२/एएफएन/२००८/४५७, दि.९.७.२००८.

मुक्ताई नगर, ता.एज्युकेशन सोसायटी संचलित कै.ग.सु.वराडे, औ.प्र.केंद्र,मुक्ताईनगर, जि.जळगांव या संस्थेस जोडारी ९ वी तुकडी (तिसरी पाळी), वीजतंत्री, ६ वी तुकडी (तिसरी पाळी) तसेच संधाता व्यवसायाच्या तिस-या तुकडीस संलग्नता प्राप्त करण्याच्या अटींच्या अधीन राहून ४ थी तुकडी सुरु करण्यास आपल्या संदर्भाधीन पत्रान्वये शिफारस करण्यात आली आहे. त्यानुसार सदर संस्थेस मागणी करण्यात आलेले अभ्यासक्रम मंजूर करण्यात येत आहे.

२. सदर तुकडीसाठी विद्यार्थी प्रवेश करण्यापूर्वी डी.जी.ई.टी.,नवी दिल्ली यांची संलग्नता प्राप्त करणे आवश्यक राहील. शासन निर्णय, क्र.आयटीआय/२००८/(२६४/०८)/व्यशि-२, दि.१७ मे, २००८ मधील अटींच्या अधीन राहून सदर मान्यता देण्यात येत आहे.

(सु.न.जोशी)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.
१. उपसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय,नाशिक
२. जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी यांचे कार्यालय,जळगांव.
३. प्राचार्य, मुक्ताई नगर, ता.एज्युकेशन सोसायटी संचलित कै.ग.सु.वराडे, औ.प्र.केंद्र,मुक्ताईनगर, जि.जळगांव
४. निवड नस्ती, व्यशि-२